ऐकापंडितजन॥ तुमचेवंदितोंचरण ॥ १॥ नकाकरूंनरस्तुति॥माझीप्ररिसाहेविनंति ॥२॥ अन्नआच्छादन॥ हेतोप्रारब्धाअधीन॥ ३ ॥ तुकाह्मणेवाणी॥ सुखेंवेंचानारायणीं ॥ ४ ॥ ॥ २६०२॥

विठ्ठलटाळविठ्ठलदिंडी ॥ विठ्ठलतोंडींउच्चारा॥ १ ॥ विठ्ठलअवघ्यांभांडवल ॥ विठ्ठलबोलविठ्ठल ॥ २ ॥ विठ्ठलनादविठ्ठलभेद ॥ विठ्ठलछंदविठ्ठल ॥ ३ ॥ विठ्ठल

सुखाविठ्ठलदुःखा ॥ तुकयामुखाविठ्ठल ॥ ४॥ २६०४॥
कायतुझेंवेंचेमजभेटीदेतां ॥ वचनबोलतांयेकदोन॥
॥ १ ॥ कायतुझेंरूपघेतोंमीचोरून ॥ त्याभेणेलपोनरा
हिलासी॥ २॥ कायतुझेंआह्माकरावेंवैकुंठ॥ भेवोनको
भेटआतांमज॥ ३॥ तुकाह्मणेतुझीनलगेदसोडी॥ परी
आहेआवडीदर्शनाची॥ ४॥ ॥ २६०५॥
संतनिंदाज्याचेघरीं॥ नव्हेघरतेंयमपुरी॥ १ ॥ त्याच्या
पापानाहींजोडा॥ ज्याच्यासंगेंजनापीडा॥ २॥ संतनिं
दाआवडेज्यासी॥ तोजीताचिनर्कवासी॥ ३॥ तुकाह्म
णेनष्ट॥ जाणागाढवतोस्पष्ट ॥ ४॥ ॥ २६०६॥
आलेंदेवाचियेमना ॥ तेथेकोणाचेंचालेना॥ १॥ हरि
श्चंद्रताराराणी ॥ वाहेडोंबाघरींपाणी ॥ २ ॥ पांडवा
चासाहाकारी॥ राज्यावरुनिकेलेंदुरी॥ ३ ॥ तुकाह्मणे
उगेचिराहा॥ होईलतेंसहजपाहा॥ ४॥ ॥ २६०७॥
निजल्यानेंगातांउभानारायण ॥ बैसल्याकीर्तनकरि
तांडोले॥ १ ॥ उभाराहोनियांमुखींनामवदे ॥ नाचेहा
गोविंदनानाछंदें ॥ २ ॥ मारगींचालतांमुखींनामवा
णी॥ उभाचक्रपाणीमागेंपुढें ॥ ३ ॥ तुकाह्मणेयासी
कीर्तनाचीगोडी॥ प्रेमेंघालीउडीनामासाठीं॥ ४॥
॥ २६०८॥
कामक्रोधआह्मीवाहिलेविठ्ठलीं ॥ आवडीधरिलीपा
यांसवें॥ १ ॥ आतांकोणपाहेमागेंपरतोनी ॥ गेलाहा
रपोनिदेहभाव ॥ २ ॥ रिद्धिसिद्धिसुखेंहाणितल्याला

ता ॥ तथेंयाप्राकृताकोणमानी ॥ ३ ॥ तुकाह्मणेआ
ह्मीविठोबाचेदास ॥ करुनिठेलोंग्रासब्रह्मांडाचा ॥ ४ ॥
॥ २६०९ ॥
उठाउठीअभिमान ॥ जायऐसेंस्थळकोण ॥ १ ॥ तेंया
पंढरिसींघडे ॥ खळापाझररोकडे ॥ २ ॥ नेत्रींअश्रूचि
याधारा ॥ उठतीरोमांचशरीरा ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाला ॥
कोठेंअभेददेखिला ॥ ४ ॥ ॥ २६१० ॥
पंढरीपंढरी ॥ ह्मणतांपापचियाहेरी ॥ १ ॥ धन्यधन्यज
गींठाव ॥ होतोनामाचाउत्साव ॥ २ ॥ रिद्धिसिद्धिलो
टांगणीं ॥ प्रेमसुखाचियाखाणी ॥ ३ ॥ अधिकअक्ष
रानेंयेका ॥ भूवैकुंठह्मणेतुका ॥ ४ ॥ ॥ २६११ ॥
अल्पमाझीमती ॥ ह्मणुनियेतोंकाकुळती ॥ १ ॥ आतां
दाखवादाखवा ॥ मजपाउलेंकेशवा ॥ २ ॥ धीरमा
झ्यामना ॥ नाहींनाहींनारायणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेदया ॥
मजकराअभागिया ॥ ४ ॥ ॥ २६१२ ॥
भारघालींदेवा ॥ नलगेदेशडोईघ्यावा ॥ १ ॥ देहप्रार
ब्धाआधीन ॥ सोसेअधिकवाढेशीण ॥ २ ॥ व्यवसा
यनिमित्य ॥ फळदेतसेसंचित ॥ ३ ॥ तुकाह्मणेफिरे ॥
भोवंडीनेंदमजीरे ॥ ४ ॥ ॥ २६१३ ॥
भोगभोगावरीद्यावा ॥ संचिताचाकरुनिठेवा ॥ १ ॥
शांतिधरणेंजीवासाठीं ॥ दशाउत्तमगोमटी ॥ २ ॥ दे
हलेखावेअसार ॥ सत्यपरउपकार ॥ ३ ॥ तुकाह्मणेहे
मिराशी ॥ बुडीद्यावीब्रह्मरसीं ॥ ४ ॥ ॥ २६१४ ॥

येथें बोलोनियां काय ॥ व्हावा गुरु तरी जाय ॥ १ ॥ मज
नसाहेवांकडें ॥ ये विठ्ठल कथे पुढें ॥ २ ॥ ऐकोनि मरसी
कथा ॥ जंव आहेसी तूं जीता ॥ ३ ॥ दुरमति तीची चाड ॥
तेणें करावी बडबड ॥ ४ ॥ पुसेल कोणि त्यास ॥ जारे क
रीं उपदेश ॥ ५ ॥ आह्मी विठ्ठलाचे वीर ॥ फोडूं कळिका
ळाचें शिर ॥ ६ ॥ घेउं पुढति जन्म ॥ वानुं कीर्ति मुखें ना
म ॥ ७ ॥ तुका ह्मणे मुक्ति ॥ नाहीं आस चि ये चित्तीं ॥ ८ ॥
॥ २६१५ ॥
अनुहतीं गुंतला नेणे बाह्यरंग ॥ वृत्ति येतां मग बळ ला
गे ॥ १ ॥ मदें मातेतया नाहीं देहभाव ॥ आपुले अवयव
आवरितां ॥ २ ॥ आणिक ची वाणी वदे तेणें मुखें ॥ उप
चार दुःखें नाठवती ॥ ३ ॥ तें सुख बोलतां आश्चिर्य या ज
ना ॥ विपरीत मना भासतसे ॥ ४ ॥ तुका ह्मणे बाह्य रंगतें
विठ्ठलें ॥ अंतर निवालें ब्रह्मरसें ॥ ५ ॥ ॥ २६१६ ॥
ब्रह्मरस गोडी तयासी फावली ॥ वासना निमाली सकळ
ज्याची ॥ १ ॥ नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळा ॥ उपाधि
वेगळा जाणीवेसी ॥ २ ॥ मन हें संचलें झालें ये केठाईं ॥
तया उणें काई निज सूखा ॥ ३ ॥ तें चि पुण्यवंत पर उपका
री ॥ प्रबोधी त्या नारी नर लोकां ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्याचे
पाईं पायपोस ॥ होवोनियां वास करीन तेथे ॥ ५ ॥
॥ २६१७ ॥
जैसें तैसें राहे देवाचें हें देणें ॥ यत्न करितां तेणें काय न व्हे ॥ १
दासा कृपासिंधु नुपेक्षि सर्वथा ॥ अंतरींची व्यथा कळे

त्यासी २॥ मागोंनेणेपरीमायजाणेवर्म॥बाळानेदिश्र
मपावोकाई ॥ ३॥ तुकाह्मणेमज अनुभव अंगें॥ वचन
वाऊगेंमानेनाहें ॥ ४ ॥ ॥ २६१८ ॥
परद्रव्यपरनारीचाअभिलाष ॥ तेथुनिहाऱ्हाससर्वभा
ग्या ॥ १ ॥ घटिकादीसमासवर्षेलागतितीन ॥ बांध
लेंपतनगांठोळीस ॥ २ ॥ पुढेंघातत्याचारोकडाशकुन
पुढेंकरिगुणनिश्चयेसीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेकातडताथ
वड ॥ काळलागेनाडपरिखरा॥ ४ ॥ ॥ २६१९ ॥
आह्माहरिच्यादासाकांहीं ॥ भयनाहींत्रैलोकीं ॥ १ ॥
देवउभामागेंपुढें॥उगवीकोडसंकट॥ २ ॥ जैसाकेलातै
साहोय ॥ धांवेसोयधरोनी॥ ३ ॥ तुकाह्मणेअसोसुखें॥
गाऊंमुखेंविठोबा ॥ ४ ॥ ॥ २६२० ॥
समर्थाचेंकेलें ॥ कोणाजाईलमोडिलें ॥ १ ॥ वायांकरा
वींउत्तरें ॥ खटपटसोसपूरे ॥ २ ॥ ठेविलाजोठेवा॥ आपु
लालातैसाखावा ॥ ३ ॥ ज्याचेंत्याचेहातीं ॥ भुकेत
याचीफजिती ॥ ४ ॥ तुकाह्मणेबाळेंकोटी ॥ झालिशू
ळतिहींपोटीं ॥ ५ ॥ ॥ २६२१ ॥
हेमाझीमिरासी ॥ ठावतुझ्यापायांपासीं ॥ १ ॥ याचा
धरीनअभिमान ॥ करीनआपुलेंजतन ॥ २ ॥ देवोनि
यांजीव ॥ बळीसाधिलाहाठाव ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवा ॥
जुनाटहेमाझीसेवा ॥ ४ ॥ ॥ २६२२ ॥
नेणेगतिकायकवणअधोगती ॥ मानिलीनिश्चिंतीतु
झ्यापाईं ॥ १ ॥ कर्मधर्मकोणनेणेहाउपाव ॥ तुझ्यापा

ईभावठेवियेला ॥ २ ॥ नेणेनिरसूंपापपुण्यनेणेकाय ॥
॥ ह्मणोनियांपायधरिलेतूझे ॥ ३ ॥ वेडामीअविचार
नकळेविचार ॥ तुजमाझाभारपांडुरंगा ॥ ४ ॥ तुकाह्म
णेतुजकरितांनव्हेकाय ॥ माझातोउपायकवणतेथें ॥
॥ ५ ॥ ॥ २६२३ ॥
तुझाह्मणवोनिजालोंउतराई ॥ त्याचेंवर्मकांईमीहिने
णें ॥ १ ॥ हातींधरुनियांदावींमजवाट ॥ पुढेंकोणनीट
तेचिदेवा ॥ २ ॥ देवभक्तपणकरावेंजतन ॥ दोहींप
क्षींजाणतूंचिवळी ॥ ३ ॥ अभिमानेंतूजलागलीहेला
ज ॥ शरणागताकाजकरावया ॥ ४ ॥ तुकाह्मणेबहु
नेणतामीफार ॥ ह्मणोनिविचारजाणविला ॥ ५ ॥
॥ २६२४ ॥
मारगींचालतांपाउलापाउलीं ॥ चिंतावीमाउलीपांडु
रंग ॥ १ ॥ सर्वसुखलागेघेवोनियांपाठीं ॥ आवडीच्या
कंठींरसवोती ॥ २ ॥ पीतांबरछायाकरीलोभापर ॥ पा
हेतेंउत्तरआवडीचें ॥ ३ ॥ तुकाह्मणेहेंचिकरावेंजीवन ॥
वाचेनारायणतानभूक ॥ ४ ॥ ॥ २६२५ ॥
झालोंआतांदास ॥ माझेतोडोनियांपाश ॥ १ ॥ ठाव
द्यावापायांपासीं ॥ मीतोपातकाचीराशी ॥ २ ॥ सक
ळहिगोवा ॥ माझाउगऊनीदेवा ॥ ३ ॥ तुकाह्मणेभय ॥
कराजवळीतेंनये ॥ ४ ॥ ॥ २६२६ ॥
अंतरींचेजाणा ॥ तरीकांयेऊंदिल्हेमना ॥ १ ॥ तुमची
करावीम्यासेवा ॥ आतांअव्हेरितांदेवा ॥ २ ॥ नव्हनि

मोडामोडी॥ केलीमागेंतेचिघडी ॥ ३ ॥ तुकाह्मणेदि
ल्हावाव॥पाईलागोंदिल्हाभाव॥ ४॥ ॥२६२७॥
पवित्रहोईनचरित्रउच्चारें॥ रूपाच्याआधारेंगोजरिया
॥ १ ॥ अपुरतीबुद्धिपुण्यनाहींगांठीं॥पाईंघालीमिठीपा
हेंडोळां॥ २ ॥ गाईनवोवियासिष्टांच्याआधारें ॥ सारि
नविचारेंआयुष्याचा॥ ३ ॥ तुकाह्मणेतुझेंनामनाराय
णा॥ठेवीनमीमनाआपुलीया॥ ४॥ ॥२६२८॥
कायऐसाजन्मजावावायांवीण॥कांहींतरीऋणअसो
माथां ॥ १ ॥ कोणेतरीकाळेंहोईलआठव ॥ नाहींजरी
भावभारखरा॥ २॥शतायेकातरीजन्माचेशेवटीं॥कृपा
ळुवापोटींयेईलदया॥३॥तुकाह्मणेनाहींफांकोतरीदेत॥
सर्वांचेंउचितसांपडलें॥ ४॥ ॥२६२९॥
नाहींकोण्हिदिसेजातवायावीण ॥ साध्यनाहींशीणल
टिकाचि ॥ १ ॥ येकाचियामाथाअसावेंनिमित्य ॥
नासोनाहींहीतकपाळींते॥ २ ॥ कांहींतरियेकबोलाया
चाजागा॥ नेदितिवाउगाउभाठाके ॥ ३ ॥ तुकाह्मणे
वर्मेंकळोयेतीकांहीं ॥ वोळखीजेनाहींहोईलते ॥ ४ ॥
॥२६३०॥
कायकरीलतेंकरोविश्वंभर॥ सेवकांदरिद्रलाजनाहीं॥
॥ १ ॥ मजपासोनीहेंपडिलेंअंतर॥ कायतोअव्हेरकरूं
जाणे॥ २ ॥ नामाच्याचिंतनेंनाशीगर्भवास॥ नेदीकरूं
आसआणिकाचि ॥ ३ ॥ ऐसेंहेंहिकळोंआलेंमाझ्याम
ना॥हरिचियाजनानाशनाहीं॥४॥तुकाह्मणेनेणोकिती

वायांगेले ॥ तयांउद्धरिलेपांडुरंगें ॥ ५॥ ॥२६३१॥
संध्याकरितोसीकेशवाचेनावें ॥ आरंभींतेंठावेंनाहीं
कैसें ॥ १ ॥ कितियासांगावेंकरुनिफजीत ॥ खळनेणे
हीतजवळीतें ॥ २॥ माजल्यानकळेउचिततेंकाय ॥
नघ्यावेंतेंकायघ्यावेंसांडी ॥ ३ ॥ तुकाह्मणेघेतीभीति
सवेंडोकें॥ वावसिनेंयेकअंधारिली॥ ४॥ ॥२६३२॥
दुधाचेघागरीमद्याचाहाबिंदु ॥ पडिलीयाशुद्धनव्हे
मग॥ १॥ तैसेंखळामुखेंनकरावेंश्रवण ॥ अहंकारेंम
नविटाळलें॥ २॥ कायकरावींतींबत्तीसलक्षणें ॥ ना
कनाहींतेणेंवायांगेलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेअन्नजिरोंने
दीमासी॥ आपुलियाजैसीसंसर्गे॥ ४ ॥ २६३३॥
सांगावेंतेंबरेंअसतेंहेंपोटीं ॥ दुःखदेतीखोटीबुद्धीमग
॥ १॥ आपुलाआपणकरावाव्यवहार॥ जिंकोनीअं
तरमनाग्वाही ॥ २ ॥ नाहींमागेंयेतबोलिलेंवचन ॥
पावावातोशीणबरामग ॥ ३ ॥ तुकाह्मणेबहुभ्यालों
खटपटे॥ आतांदेवाखोटेशब्दपूरे॥४॥ ॥ २६३४॥

वाराणसीस पत्र पाठविलेंते अभंग

परिसवोमातेमाझीविनवणी॥ मस्तकचरणींठेवितसें
॥ १ ॥ भागीरथीमहादोषनिवारणी॥ सकळांस्वामि
णी तीर्थांचिये॥ २॥ जिताभुक्तीमोक्षमरणतुझ्यातीरीं
॥ ऐहिकपरत्रींसुखरूप॥ ३ ॥तुकाविष्णुदाससंतांचेंपो
षण॥वाग्पुष्पतेणेंपाठवीलें॥ ४॥ ॥२६३५॥
तुह्मीविश्वनाथ॥ दीनरंकमीअनाथ ॥ १ ॥ कृपाकरा

लतेथोडी॥पायांपडिलोंबराडी॥२॥कायउणेंआह्मा पासीं॥मीतोअल्पचिसंतोषी॥३॥तुकाह्मणेदेवा॥ कांहींभातुकेंपाठवा॥४ ॥२६३६॥

पिंडपदावरी॥दिल्हाआपुलियेकरीं॥१ माझेंझालें गयावर्जन॥फिटलेंपितरांचेंऋण॥२॥केलेंकर्मांतर॥ बोंबमारीलीहरिहर॥३॥तुकाह्मणेमाझें॥भारउतर लेंवोझें॥४॥ ॥२६३७॥

मथुरेच्याराया॥माझेंदंडवतपायां॥१॥तुमचेरूपे चेंपोसणें॥माझासमाचारघेणें॥२॥नामधरियेलेंकं ठीं॥असेंआर्तभूतपोटीं॥३॥जीवींचेंतेंजाणा॥तुका ह्मणेनारायणा॥४॥ ॥२६३८॥

जायतिकडेलागेपाठीं॥नाहींतुटीआठवची॥१॥ह रोनियांनेलेंचित्त॥माझेंथीतभांडवल॥२॥दावोनि यांरूपडोळां॥मनचाळालावियेला॥३॥आणिकतों डापडलीमिठी॥कानगोष्टीनायकती॥४॥बोलिल्या चाआठवनघडे॥वाणीवाढेतेसोई॥५॥तुकाह्मणेप्रे मधर्गीं॥भरलीअंगींअखंड॥६॥ ॥२६३९॥

नकोझालेंऐसेंअन्न॥भूकतानतेगेली॥१॥गोविंदा चीआवडिजीवा॥करीनसेवाधणिवरी॥२॥राहिलें तेंराहोकाम॥सकळधर्मदेहींचें॥३॥देहधरिल्याचेंफ ळ॥आणिककाळधन्यहा॥४॥जाऊंनेदीकरितांवा स॥क्षमादोषकरवीना॥५॥तुकाह्मणेयाचेपाठीं॥आ तांसाठीजीवाची॥६॥ ॥२६४०॥

बाटपाहेहरिकांनयेअझुनी ॥ निष्ठुरकांमनींधरियेलें ॥ ॥ १ ॥कायकरूंधीरहोतनाहींजीवा ॥ कायआइठेवाउ भाठला ॥ २ ॥ नाहींमाझाधांवापडियेलाकानीं ॥ कोठेचक्रपाणीगुंतलेती ॥ ३ ॥ नाहींआलेंकळोंअंतरा अंतर ॥ रूपावंतफारआईकतों ॥ ४ ॥ बहुतांदिसाचें राहिलेंभातुकें ॥ नाहींकवतुकेंकुर्वाळिलें ॥ ५ ॥ तुकाह्म णेदेईयेकवेळाभेटी ॥ सीतळहेंपोटींहोईलमग ॥ ६ ॥ ॥ २६४१ ॥

नाहींदिलेंहेंकधींकठीणउत्तर ॥ तरिकांअंतरपडीयेलें ॥ १ ॥ ह्मणउनीआतांवियोगनसाहवे ॥ लांचावलेंदे हेंसंघट्टण ॥ २ ॥ वेळोवेळांवाचेआठवितोंनाम ॥ अ धिकचिप्रेमचढेघेतां ॥ ३ ॥ तुकाह्मणेपांडुरंगेजननी ये ॥ घेवोनीकडियेबुझाविलें ॥ ४ ॥ ॥ २६४२ ॥

आतांनकरींसोस ॥ सेवीनहाब्रह्मरस ॥ १ ॥ आह्माल क्षणअमृत ॥ ब्रह्मपदींचेंनिश्चित ॥ २ ॥ तुमचानिजठे वा ॥ आह्मापडियेलाठावा ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवराया ॥ आतांलपालेतिवायां ॥ ४ ॥ ॥ २६४३ ॥

जेथेजेथेजासी ॥ तेथेमजसितूंपाहासी ॥ १ ॥ ऐसापस रीनभाव ॥ रितानाहींकोण्हीठाव ॥ २ ॥ चित्तजडलेंपा ई ॥ पाळतीहेठाईठाई ॥ ३ ॥ तुकाह्मणेपोटीं ॥ देवघा लोनिसांगेगोष्टी ॥ ४ ॥ ॥ २६४४ ॥

सांपडलाहातीं ॥ तरिझालीहेनिश्चिती ॥ १ ॥ नाहींधां वाघेतमन ॥ इंद्रियांचेंसमाधान ॥ २ ॥ सांडियेलाहे

वा ॥ अवघासंचिताचाठेवा ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाम ॥
निरखुनियांघेतोंनाम ॥ ४ ॥ ॥ २६४५ ॥
मुक्तिपांगनाहींविष्णुचियादासा ॥ संसारतेकैसानदे
खती ॥ १ ॥ बैसलागोविंदजडोनीयांचित्तीं ॥ आदिते
चिअंतींअवसानीं ॥ २ ॥ भोगनारायणदेऊनीनिरा
ळी ॥ वोवियामंगळींतोंचिगाती ॥ ३ ॥ बळबुद्धीत्या
चीउपकारासाठीं ॥ अमृततेपोटींसांठवीलें ॥ ४ ॥ दया
वंततरीदेवाचिसारिखी ॥ आपुलिपारखीनोळखती
॥ ५ ॥ तुकाह्मणेत्याचाजीवतोचिदेव ॥ वैकुंठतोठाव
वसतीतो ॥ ६ ॥ ॥ २६४६ ॥
सेविनउच्छिष्टलोळेनअंगणीं ॥ वैष्णवाचेनाहणींहो
ईनकिडा ॥ १ ॥ ऐसेंजन्मआतांमजदेईदेवा ॥ आवडी
हेजीवासर्वकाळ ॥ २ ॥ त्याचेचरणरजयेतीअंगावरी
वंदीनतेशीरींजाईनमागें ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेंराहिला
सेभाव ॥ सकळहिवावजाणोनियां ॥ ४ ॥ ॥ २६४७ ॥
क्षेमदयालाहो ॥ स्फुरतातिदंडबाहो ॥ १ ॥ आतांझड
झडांचाले ॥ देईउचलुनिपाऊलें ॥ २ ॥ सांडीहेसंगती ॥
बहुउत्कंठाहेचित्तीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेआई ॥ श्रीरंगेविठा
बाई ॥ ४ ॥ ॥ २६४८ ॥
जेणेंवेळलागे ॥ ऐसेंसांडींपांडुरंगे ॥ १ ॥ कंठकंठामि
ळोनिदेई ॥ माझावोरसतूंघेई ॥ २ ॥ नकोपीतांबर ॥
सावरुंहेअलंकार ॥ ३ ॥ टाकींवोभातुकें ॥ लौकिकाचें
कवतुकें ॥ ४ ॥ हातापायानको ॥ कांहींवेगळालेराखों

॥ ५ ॥ तुकाह्मणेयावरी ॥ मगसुखेअलंकारी ॥ ६ ॥
॥ २६४९ ॥

दाऊनियांकोणाकांहीं ॥ तेचिवाहीचाळविली ॥ १ ॥ तैसेंनकोकरूंदेवा ॥ शुद्धभावमाझिया ॥ २ ॥ रिद्धीसिद्धीऐसीआड ॥ येतीनाडनागऊं ॥ ३ ॥ उदकाऐसेंदाउनिवोढी ॥ ऊरफोडीझळई ॥ ४ ॥ दर्पणीचेंदिल्हेंधन ॥ दिसेपणचरफड ॥ ५ ॥ तुकाह्मणेपायांसाठीं ॥ करितांआटीकळोंद्या ॥ ६ ॥ ॥ २६५० ॥

कायमाताविसरेबाळा ॥ कळवळाप्रीतीचा ॥ १ ॥ आवडीनेंगळांमिठी ॥ घालीउठीबैसवी ॥ २ ॥ लाऊंधांवेमुखस्तना ॥ नयेमनानिराळें ॥ ३ ॥ भावंडाचेंभातेंदावी ॥ आपुलेंलावीत्यासर्जी ॥ ४ ॥ माझेथोडेंत्याचेंफार ॥ उत्तरेंहेंवाढवी ॥ ५ ॥ तुकाह्मणेनारायणा ॥ तुह्मीजाणाबुझाऊ ॥ ६ ॥ ॥ २६५१ ॥

कृपेचावोल्हावा ॥ दिसेवेगळाचिदेवा ॥ १ ॥ मीहेंइच्छीतसेंसाचें ॥ नलगेफुकटसोईकाचें ॥ २ ॥ जेणेंजायकळसा ॥ पायांउत्तमतोतैसा ॥ ३ ॥ तुकाह्मणेघरीं ॥ तुझ्याअवघोचपरी ॥ ४ ॥ ॥ २६५२ ॥

तरीआह्मीतुझीधरियेलीकास ॥ नाहींकोण्हीदासवायांगेला ॥ १ ॥ अगापंढरीच्याउभाविटेवरी ॥ येईलवकरीधांवेनेटें ॥ २ ॥ पालवितोंवरीउभारोनिबाहे ॥ कृपावंतापाहेमजकडे ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुजबहुकानडोळे ॥ कांहोमाझेवेळेऐसीपरी ॥ ४ ॥ ॥ २६५३ ॥

करावाकंठाळानव्हेहें उचित ॥ आर्धींचकांप्रीतलाविये
ली ॥ १ ॥ जाणतसातुझीरूपाचेंलाघव ॥ आपुलाले
जीवघेतेऐसा ॥ २ ॥ कायह्मणऊनिआलेतिआकारा ॥
आह्माउजगराकरावया ॥ ३ ॥ तुकाह्मणेभीडहोतीआ
जिवरी ॥ आतांदेवाउरीकोणठेवी ॥ ४ ॥ ॥ २६५४ ॥
धरूनीपालवआसडुनिकरें ॥ मगकायबरेंदिसेलोकीं
॥ १ ॥ कायतेंविचाराठाईचेंआपणा ॥ जोहानारायणा
अवकाश ॥ २ ॥ अंतरपायांसींतोंवरीयागोष्टी ॥ पडि
लियामिठीहालोंनेदी ॥ ३ ॥ रुसलेतीतरीहोईलबुझाव
णी ॥ तांतडीकरूनिसाधावेंहें ॥ ४ ॥ सांपडलियाअधी
कारणासींठाव ॥ येथेंकरूंभावदृढआतां ॥ ५ ॥ तुकाह्म
णेतुझेठाउकेबोभाट ॥ मगखटपटचुकलीते ॥ ६ ॥
॥ २६५५ ॥
निष्ठुरउत्तरींनधरावाराग ॥ आहेलागभागठाईचाची
॥ १ ॥ तूंमाझीजननीतूंमाझाजनिता ॥ रखुमाईच्या
कांतापांडुरंगा ॥ २ ॥ मुळींच्याठेवण्याआहेअधिकार ॥
दूराऊनिदूरगेलोंहोतों ॥ ३ ॥ पोटींचाअठवापडिलावि
सर ॥ कांहींआलाभारमाथातेणें ॥ ४ ॥ राखिलाहाहो
तावडुचौघाचार ॥ साक्षीनेंव्यवहारनिवडीला ॥ ५ ॥
तुकाह्मणेकांहींबोलणेंनलगे ॥ आतांपांडुरंगेतुह्मीऐसे
॥ ६ ॥ ॥ २६५६ ॥
सांगतांगोष्टीलागतीगोड ॥ हातोराकडअनुभव ॥ १ ॥
सुखझालेंसुखझालें ॥ नयेबोलेबोलतां ॥ २ ॥ अंतरनें

नयेदिसों ॥ आतांसोसकराया ॥ ३ ॥ तुकाह्मणेजतन
करूं ॥ हेचिधरूंजीवेसी ॥ ४ ॥ ॥२६५७॥
मजसींपुरेनपडेवादें ॥ सुखदोहींच्यासंवादें ॥ १ ॥ तूंचि
आगळाकशानें ॥ शिरकायपायांवीण ॥ २ ॥ वाहोंतुझा
भार ॥ दुःखसाहोनिअपार ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींभेद ॥
देवाकरूंनयेवाद ॥ ४ ॥ ॥२६५८॥
तुजनाहींशक्ति ॥ कमघेसीआह्माहातीं ॥ १ ॥ ऐसेंअ
नुभवेंपाहीं ॥ उरलेबोलीजेसेंनाहीं ॥ २ ॥ लपोनियांआ
ड ॥ आह्मातुझाचीकैवाड ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुजसाठीं ॥
आह्मासंसारेसीतुटी ॥ ४ ॥ ॥२६५९॥
तुझ्याठाईंवोस ॥ दोन्हीपुण्यआणिदोष ॥ १ ॥ झडलेउरले
किती ॥ आह्मीधरियेलेचित्तीं ॥ २ ॥ कळलासीनष्टा ॥
यातिक्रियाकर्मभ्रष्टा ॥ ३ ॥ तुकाह्मणेबोला ॥ नाहींता
ळागाविठ्ठला ॥ ४ ॥ ॥२६६०॥
भांडावेंतोंहित ॥ ठाईंपडतेंउचित ॥ १ ॥ नयेखंडोंदेवो
वाद ॥ आह्माभांडवलभेद ॥ २ ॥ शब्दासारसेभेटी ॥
नयेपडोंदेऊंतुटी ॥ ३ ॥ तुकाह्मणेआळस ॥ तोचिकार
णाचानाश ॥ ४ ॥ ॥२६६१॥
नव्हेंगांढेआळसी ॥ जोतूंआह्मापुढेंजासी ॥ १ ॥ अरे
दिल्हेंआह्माहातीं ॥ वर्मवेवादाचेसंती ॥ २ ॥ धरुनियां
वाट ॥ झालोंशिरोमणिथोट ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवा ॥
वादेंकरिनखरीसेवा ॥ ४ ॥ ॥२६६२॥
तुझाविसरनको माझियाजीवा ॥ क्षणरेकेशवामाय

बापा ॥ १ ॥ जावोराहोदेहआतांयेचिघडी ॥ कायसी
आवडीयाचीमज ॥ २ ॥ कुश्चळइंद्रियेंआपुलियागुणें ॥
याचियापाळणेंकोणाहीत ॥ ३ ॥ पुत्रपत्नीबंधुसोयरी
खाणोरी ॥ यांचाकोणधरीसंगआतां ॥ ४ ॥ पिंडहाउ
सणाआणिलापांचांचा ॥ सेखींलागज्याचात्यासदेणें
॥ ५ ॥ तुकाह्मणेनाहींआणिकसोयरे ॥ तुजविणदुसरे
पांडुरंगा ॥ ६ ॥ ॥ २६६३ ॥
ऐसेंसत्यमाझेंयेईलअंतरा ॥ तरीमजकराकृपादेवा ॥
॥ १ ॥ वचनासारिखेंतळमळीचित्त ॥ बाहेरितोआंत
होईलभाव ॥ २ ॥ तरीमजठावद्यावापायांपाशीं ॥ स
त्यत्वेंजाणसीसदाखरा ॥ ३ ॥ तुकाह्मणेसत्यनिकटशे
वकें ॥ तरीचभातुकेंप्रेमद्यावें ॥ ४ ॥ ॥ २६६४ ॥
आदिवर्तमानजाणशीभविष्य ॥ मागेंपुढेंनाशसंचि
ताचा ॥ १ ॥ आतांकायदेऊंपायापेंपरिहार ॥ जाणतो
विचारकरादेवा ॥ २ ॥ आपुलेतेयेथेकायचालेकेलें ॥
जोडावेतेभलेहातपुढें ॥ ३ ॥ तुकाह्मणेफिकेबोलमाझेवा
रा ॥ करालदातारहोईलतें ॥ ४ ॥ ॥ २६६५ ॥
सुखेंनमनींअवगुण ॥ दुःखत्याचेंभोगीकोण ॥ १ ॥
हेंकांठाईचेंनकळे ॥ रातीकराझांकूनिडोळे ॥ २ ॥ चा
लोनिआडवाटे ॥ पाईमोडवीलेकांटे ॥ ३ ॥ तुकाह्मणेको
णा ॥ बोलठेवितोशाहणा ॥ ४ ॥ ॥ २६६६ ॥
आह्मीनदेखोंअवगुणा ॥ पापीपवित्रशाहाणा ॥ १ ॥
अवघींरूपेंतुझींदेवा ॥ वंदूभावेंकरूंसेवा ॥ २ ॥ मज

भक्तिसवेंचाड॥ नेणेपाषाणधातुवाड ॥ ३ ॥ तुकाह्मणे
घोंटी॥ विषअमृततुजसाठीं॥ ४॥ ॥ २६६७॥
मजनाहींतुझ्याज्ञानाचीतेचाड॥ घेतांवाटेगोडनामतु
झें॥ १ ॥ नेणेतेंलेंकरूंआवडीचेंतान्हें॥ बोलतोंवचन
आवडीनें॥ २ ॥ भक्तिनेणेकांहींवैराग्यतेंनाहीं॥ घात
लाविठाईभारतूज॥॥ ३ ॥ तुकाह्मणेनाचेंनिर्लज्जहोऊ
नी॥ नाहींमाझेमनींभावदुजा॥ ४॥ ॥ २६६८॥
कायमाझेसंतपाहतीजाणीव ॥ सर्वमाझाभावत्यां
चेपाईं ॥ १ ॥ कारणसरतेंकरापांडुरंगीं ॥ भूषणाची
जगींकायचाड॥ २ ॥ बोबड्याउत्तरींह्मणेहरिहरी॥आ
णिकभिकारिनेणेदूजें ॥ ३॥ तुकाह्मणेतुह्मीविठ्ठलाचे
दास॥ करितोंमीआसउच्छिष्टाची॥ ४॥ ॥ २६६९॥
जीवाचेजीवनअमृताचीतनु॥ ब्रह्मांडभूषणुनारायण
॥ १ ॥ सुखाचासांगातअंतकासीअंत ॥ निजाचानि
वांतनारायण ॥ २ ॥ गोडाचेंहिगोडहर्षाचेंहिकोड॥
प्रीतीचाहिलाडनारायण॥ ३ ॥ भावाचानिजभावना
वाचाहिनाव॥ अवघापंढरिरावअवतरलासे ॥ ४ ॥
तुकाह्मणेंहेंचिसाराचेंहिसार ॥ माझाअंगीकारतेणेंके
ला॥ ५ ॥ ॥ २६७०॥
आतांमीसर्वथानव्हेगादुर्बळ॥ यातिहीनकुळदैन्यवा
णा॥ १ ॥ मायरखुमाईपांडुरंगपिता॥ शुद्धउभयतांप
क्षदोन्ही॥ २ ॥ बापुडामीनव्हेदुर्बळठेंगणा॥ पांगिलहा
कोणाआणिकासी ॥ ३ ॥ द्रष्टानहोंआह्मीअभागीअ

नाथ ॥ आमुचासमर्थकैंवारीहा ॥ ४ ॥ संवसार आह्मा सरलासकळ ॥ लपोनियांकाळठेलाधाकें ॥ ५ ॥ तुकाह्म णेझालोंनिर्भरमानसीं ॥ जोडिलियाराशीसुखाचिया ॥ ६ ॥ ॥ २६७१ ॥

केलेंनाहींमनींतयाघडेत्याग ॥ उबगउद्वेगनाहींचित्तीं ॥ ॥ १ ॥ देवचिहाजाणेअंतरींचाभाव ॥ मिथ्यातोउपाव बाह्यरंग ॥ २ ॥ त्यागिल्याचेंध्यानराहिलेंअंतरीं ॥ अव घीतपरीविटंबणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेआपआपणाविचा र ॥ कोणहादुसरासांगेतुह्मा ॥ ४ ॥ ॥ २६७२ ॥

हितव्हावेंतरीदंभदूरीठवा ॥ चित्तशुद्धसेवादेवाचीहे ॥ ॥ १ ॥ आवडीविठ्ठलगाईजेयेकांतीं ॥ अलभ्यतेयेतीला भघरा ॥ २ ॥ आणिकाअंतरींनदावीवसती ॥ करावीहे शांतीवासनेची ॥ ३ ॥ तुकाह्मणेबाणहाचिनिर्वाणींचा ॥ वाउगीहेवाचावेंचूंनये ॥ ४ ॥ ॥ २६७३ ॥

होकांनरअथवानारी ॥ ज्यांचाआवडताहरी ॥ १ ॥ ते मजविठोबासमान ॥ नमूंआवडीनेंजन ॥ २ ॥ ज्याचें अंतरनिर्मळ ॥ त्याचेंसबाह्यकोमळ ॥ ३ ॥ तुकाह्मणे भावें ॥ जिहींप्रेमेंवोसंडावें ॥ ४ ॥ ॥ २६७४ ॥

हरीचीहरिकथानावडेहिजया ॥ अधमह्मणतांतयावेळ लागे ॥ १ ॥ मनुष्यदेहींतयानाटहेंलागलें ॥ अघोरसाधि लेकुंभीपाक ॥ २ ॥ कासयाजन्मासीआलातोपाषाण ॥ जंतकांहोऊनपडिलानाहीं ॥ ३ ॥ उपजेमरोनीवेळोवेळां भांड ॥ परीनधरीलंडलाजकांहीं ॥ ४ ॥ ऐसियाचिमाता

कासयाप्रसवली ॥ वरनाहींघातलीमुखावरी ॥ ५ ॥
देवधर्माविणतोहाचांडाळनर ॥ नमाहेभूमिभारक्षण
भरी ॥ ६ ॥ रामह्मणतांतुझेंकायरेवेंचलें॥कांहितआपु
लेंनविचारिसी ॥ ७ ॥ जन्मोजन्मींचातोहोईलनरकीं ॥
तुकाह्मणेचुकीजरीयासी ॥ ८ ॥ ॥ २६७५ ॥
उपेक्षिलायेणेंकोणीशरणागत ॥ ऐसीनाहींमातऐकि
येली ॥ १ ॥ आतांकायब्रीदसांडिलेंआपुलें॥ ठाईचेंधरि
लेंजाणोनियां ॥ २ ॥ माझ्यादोषासाठींहोसीपाठमोरा
ऐसाकोणपुराभोगबळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेरूपआमुच्या
कैंवारे ॥ धरिलेंगोजिरेंचतुर्भुज ॥ ४ ॥ ॥ २६७६ ॥
आवडिसारिखेंसंपादिलेंसोंग॥ अनंतहींमगझालींना
में ॥ १ ॥ कळेऐशावाटारचिल्यासुलभा ॥ दुर्गमयान
भाचाहिसाक्षी ॥ २ ॥ हातेंजेवीयेकमुखींमागेघास ॥
माउलीजयासतैसीवाळा ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझेंध्यान
विटेवरी ॥ तैसीचगोजिरीदिसेमूर्ति ॥ ४ ॥ ॥ २६७७ ॥
धन्यमीमानीनआपुलेंसंचीत ॥ राहिलीसेप्रीततुझेना
मीं ॥ १ ॥ धन्यझालोंआतांयासीसंदेहनाहीं॥नपडोंया
वाहींकाळाहातीं ॥ २ ॥ ब्रह्मरसकरूंभोजनपंगती ॥
संतांचेसंगतीसर्वकाळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेपोटधालेंचि
नधाय ॥ खादलेंचिखायआवडीनें ॥ ४ ॥ ॥ २६७८ ॥
आवडीनपुरेसेवीतांनसरे ॥ पडियेलीधुरेसवेंगांठी ॥
॥ १ ॥ नपुरेहाजन्महेंसुखासांठितां ॥ पुढतीहिआतांहें
चिमागों ॥ २ ॥ मारगाचीचिंतापालखींबैसतां ॥ ना

हींउसंनितांकोणपेणे ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझीविठ्ठलमा
उली ॥ जाणेतेलागलीतानभूक ॥ ४ ॥ २६७९ ॥
नाहींत्रिभुवनींसुखयासमान ॥ ह्मणऊनिमनस्थिराव
लें ॥ १ ॥ धरियेलींजीवींपाउलेंकोंवळीं ॥ केलीयेका
वळीनाममाळा ॥ २ ॥ शितळहोऊनीपावलोंविश्रां
ती ॥ नसाहेपुढतीचालीचित्ता ॥ ३ ॥ तुकाह्मणेझालेस
कळसोहळे ॥ पुरविलेडोहळेपांडुरंगें ॥ ४ ॥ ॥ २६८० ॥
मायबापापुढेंलाडिकेंलेंकरूं ॥ तैसेबोलकरूंकवतुकें ॥
॥ १ ॥ रूपावंताघालींप्रेमपान्हारस ॥ बोळलीवोरस
पांडुरंग ॥ २ ॥ नाहींथीरखुंटीजवळीहुंबरे ॥ ठाईचपा
खरेंकवळिते ॥ ३ ॥ तुकाह्मणेमजहोऊंनेदिशीण ॥ क
ळोंनेदीभिन्नआहेऐसें ॥ ४ ॥ ॥ २६८१ ॥
उत्तमघालावेंआमुचीयेमुखीं ॥ निवारावेंदुःखीहोऊं
नेदी ॥ १ ॥ नवैसेनवजेजवळुनीयादूरी ॥ मागेंपुढेंवा
रिघातपात ॥ २ ॥ नाहींशंकाअसोभलतियेठाईं ॥ मा
वळलेंपाहींद्वैताद्वैत ॥ ३ ॥ तुकाह्मणेभारघातलाविठ्ठलें
अंतरींभरलेंबाह्यरूप ॥ ४ ॥ ॥ २६८२ ॥
आठवोनेदीआवडिआणिका ॥ भरोनियांलोकांतिन्ही
राहे ॥ १ ॥ मनधांवेतेथेतिचेंढुभतें ॥ संपूर्णआईतें
सर्वकाळ ॥ २ ॥ नलगेवळावींइंद्रियेंधांवतां ॥ ठावना
हींरिताराहोंदिला ॥ ३ ॥ तुकाह्मणेसमपाउलाचाखुंटा ॥
झालाबळकटाहालोंनेदी ॥ ४ ॥ ॥ २६८३ ॥
आह्मा अलंकारमुद्रेचेशृंगार ॥ तुळसीचेहारवाहोंकंठीं ॥

॥ १॥ लाडिकेडिंगरपंढरीरायाचे ॥ निरंतरवाचेनाम
घोष॥ २॥ आह्माआणिकाचीचाडचित्तींनाहीं ॥ स
र्वसुखपाईंविठोबाच्या ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मीनेघो
चियायुक्ती॥ येकावीणचित्तींदुजेंनाहीं॥ ४॥

॥ २६८४॥

चलापंढरीसीजाऊं ॥ रखुमादेवीवरपाहुं॥ १ ॥ डोळे
निवतीलकान॥मनातेथेंसमाधान॥ २ ॥ संतमहंतांहो
तीभेटी॥आनंदेंनाचूंवाळवंटीं॥३॥तेथेतीर्थाचेंमाहेर॥
सर्वसुखाचेंभांडार॥ ४ ॥ जन्मनाहींरेआणिक॥ तुका
ह्मणेमाझीभाक॥५॥ ॥ २६८५ ॥

पैलघरींझालीचोरी॥ देहयाचाबोंबकरी॥ १ ॥ हाबाहा
बाकरिसीकाय॥ फिराउनीठायांठाय ॥ २ ॥ सांडोनि
यांशुद्धी ॥ निजेलासिगेलीबुद्धी॥ ३ ॥ चोरींतुझाका
ढिलाबुर॥ वेगळेभावाघातलेंदूर॥ ४ ॥ भलतीयासी
देशीवाव॥ लाहासीतूंयेवढालाड॥ ५॥ तुकाह्मणेअजु
नितरी॥ उरलेंतेंजतनकरीं॥ ६॥ ॥ २६८६॥

कितीवेळाखादलादगा ॥ अझूनिकांगाजागसिना॥
॥ १ ॥लाजनाहींहिंडतागांवें॥ दुःखनित्यनित्यनवें॥
॥ २॥ सवेंचोराहातींफासे॥ देखतांकैसेंनदेखसी॥ ३॥
तुकाह्मणेसांडितीवाट॥ तव्हपटकरावया॥ ४॥

॥ २६८७॥

मुदलामध्येंपडेतोटा॥ ऐसाखोटाउदीम ॥ १ ॥ आणि
काचीलाजनाहीं॥ आळसाजिहींत्यजिलें ॥ २॥ येके

सातेसारिखेंवित्तें ॥ हानीहोतेवेगळाली ॥ ३ ॥ तुकाह्म
णेहितधरा ॥ नव्हेपुरागांवढळ ॥ ४ ॥ ॥ २६८८ ॥
निरोपसांगतां ॥ नधरींभयनकरींचिंता ॥ १ ॥ असो
ज्याचेत्याचेमाथां ॥ आपणकरावीतकथा ॥ २ ॥ उतरा
वाभार ॥ किंवानव्हावेंसादर ॥ ३ ॥ तुकाह्मणेवाहेधा
क ॥ तयाइहनापरलोक ॥ ४ ॥ ॥ २६८९ ॥
शूरत्वासींमोल ॥ नयेकामाफिकेबोल ॥ १ ॥ केलान
संडीकैवाड ॥ जीवेंसाठितोहेहोड ॥ २ ॥ धीरतोकारण ॥
सात्यहोतोनारायण ॥ ३ ॥ तुकाह्मणेहरि ॥ दासारक्षि
तोनिर्धारीं ॥ ४ ॥ ॥ २६९० ॥
हरीच्यादासाभयें ॥ ऐसेंबोलोंतहिनये ॥ १ ॥ राहोनियां
आड ॥ उभादेवपुरवीकोड ॥ २ ॥ हरिच्यादासांचिंता ॥
अघटीतहेवारता ॥ ३ ॥ खावेंल्यावेंघ्यावें ॥ तुकाह्मणेपु
रवावें ॥ ४ ॥ ॥ २६९१ ॥
आमुचास्वदेश ॥ भुवनत्रयामध्येंवास ॥ १ ॥ मायबा
पांचीलाडकीं ॥ कळोंआलेंहेंलौकिकीं ॥ २ ॥ नाहींनि
रपराध ॥ कोणाआह्मामध्येंभेद ॥ ३ ॥ तुकाह्मणेमान ॥
अवघेंआमुचेंहेंधन ॥ ४ ॥ ॥ २६९२ ॥
सदासर्वकाळ ॥ तेथेंसुखाचाकल्लोळ ॥ १ ॥ जेथेंवस
तीहरिचेदास ॥ पुण्यपिकेंपापानाश ॥ २ ॥ फिरेसुदर्श
न ॥ घेवोनियांनारायण ॥ ३ ॥ तुकाह्मणेघरीं ॥ होय
ह्मणीयाराकामारी ॥ ४ ॥ ॥ २६९३
कायदारापुढेंघालोनीमिष्टान्न ॥ खराशीलेपनचंदना

चें ॥ १ ॥ नकोनकोंदेवाखळाचीसंगती ॥ रसज्यापंग
तीनाहींकथे॥ २॥ कायसेजवाजमाकडाविलास॥ अलं
कारानाशकरूनिटाकी ॥ ३ ॥ तुकाह्मणेकायपाजूनी
नवनीत॥ सर्पाविषथातअमृताचें ॥ ४ ॥ ॥ २६९४॥
आनंदेंयेकांतींप्रेमेंवोसंडत ॥ घेवोअगणीतप्रेमसुख
॥ १ ॥ गौप्यधननयेवारालागोयास॥ पाहोंनेदूंवासदु
र्जनासी॥ २ ॥ ह्मणीदृष्टीलागोआवडीच्यारसा॥ सेऊं
जीरेंतैसाआपणासी॥ ३॥ तुकाह्मणेऐसाबहुसकुमार॥
नसाहावेंभारवचनाचा॥ ४ ॥ ॥ २६९५॥
मोक्षपदेंतुच्छकेलींयाकारणें॥ आह्माजन्मघेणेयुगायु
गीं॥ १ ॥ विटेऐसेंसुखनव्हेभक्तिरस ॥ पुढतीपुढतीआ
ससेवावेंहे ॥ २ ॥ देवाहातींरूपधरऊंआकार॥ नेदूंनि
राकारहोऊंत्यासी॥ ३॥ तुकाह्मणेचित्तनिवांतराहिलें॥
ध्याईनपाउलेंविटेवरी॥ ४ ॥ ॥ २६९६॥
नयेबोलोंभांडा॥ खीळघालोनिबैसेतोंडा ॥ १ ॥ ऐक
विठोबाचेगुण॥ करीसादरश्रवण॥ २॥ प्रेमसुखाआ
ड॥ कायवाजतेंचांभाड ॥ ३ ॥ तुकाह्मणेहिता ॥ कांरे
नागवसीथीता॥ ४ ॥ ॥ २६९७॥
अतीझालेंउत्तमवेश्येचेंलावण्य ॥ परितेसुवासीणन
ह्मणावी ॥ १ ॥ उचितअनुचितकेलेठायाठाव ॥ गुणा
मोलवावथोरपण ॥ २ ॥ शूरत्वावांचूनीशूरामाजिठा
व॥ नाहींआयुर्भावआणिलीया ॥ ३ ॥ तुकाह्मणेसों
गपोटाचेउपाय॥ कारणकमाईविणनाहीं॥ ४॥ २६९८

शूरासाजतीहातियारें॥ गांड्याहांसतीलपोरें॥ १॥का यकेलींविटंबण॥ मोतीनासिकावांचून॥ २॥ पतिव्र तेरूपसाजे॥ शिंदळकाजळलेतांलाजे॥ ३॥ दासीप त्नीसुता॥ नव्हेसरीयेकपिता॥ ४॥मानबुद्धिवंता॥ थो रनमानीतीपिता॥ ५॥ तुकाह्मणेतरी॥ आतांशुद्धदंडे वरी॥ ६॥ ॥२६९९॥

कायकेलेंजळचरीं॥ धीवरत्याचाघातकरी॥ १॥ हा तोठाईचाविचार॥ आहेयातिवैराकार॥ २॥ श्वापदां तेंवधी॥ निरपराधेंपारधी॥ ३॥ तुकाह्मणेखळ॥ सं तांपीडितीचांडाळ॥ ४॥ ॥२७००॥

वाईटआणिभले॥हीनेंदाविलेचांगले॥ १॥ येकाविणें येका॥ कैचेंमोलहोतेंफुका॥ २॥ विषदाविलेंअमृत॥ कडूगोडघातेंहित॥ ३॥ काळीमेनेज्योती॥ दिवसेंक ळोंआलीराती॥ ४॥ उंचनिंचगारा॥ हिरापरिमोहरा॥ ५॥तुकाह्मणेभले॥ ऐसेंनष्टानींकळलें॥ ६॥ २७०१॥

असोऐसेखळफार॥ आह्मायांचेउपकार॥ १॥ करि तीपातकाचीधुणी॥ मोलनघेतांसाबणी॥ २॥ फुका चेमजूर॥ वोझेवागवीतीभार॥ ३॥ पारउतरूनह्मणे तुका॥ आह्माआपणजातीनरका॥ ४॥ ॥२७०२॥

संतपंढरीसीजाती॥ निरोपधाडीतयाहातीं॥ १॥ मा झानपडावाविसर॥ तुकाविनवितोकिंकर॥ २॥ केर सुणीमहाद्वारीं॥ तेमीअसेंनिरंतरीं॥ ३॥ तुमचेपायीं पायतण॥ मोचेमाझेंतनमन॥ ४॥ तांबूलाचीपि

कधरणी॥ तेमीअसेंमुखपसरोनी ॥५॥ तुमचीविष्ठा
पंढरिराया॥ तेसारखुबीमाझीकाया ॥६॥ लागतीपा
दुका ॥ तेमीतळीलमृत्तिका ॥ ७ ॥ तुकाह्मणेपंढरिना
था॥ दुर्जेनधरावेंसर्वथा॥८॥ ॥२७०३॥

इच्छेचेंपाहिलें॥ डोळियाअंतींमोकलिलें ॥ १ ॥ याचा
विश्वासतोकाई॥ ऐसेविचारूनिपाहीं ॥ २ ॥ सुगंधअ
भ्यंगेंपाळितां ॥ केशफिरलेजाणतां ॥ ३ ॥ पिंडपाळि
तांवोसरे॥ अवघेघेऊनिमागेंसरे॥ ४॥ करितांउपच्या
र॥ कोणानाहींउपकार॥ ५ ॥ अल्पजीवनकरी॥ तुका
ह्मणेसाधींहरि॥ ६॥ ॥२७०४॥

यज्ञनिमित्यतेंशरीरासीबंधन ॥ कांरेतृष्णावायांवीण
वाढविली॥१॥नव्हेतेचिभक्तिपरलोकसाधन॥विषया
नेंबंधनकेलेंतुज ॥ २ ॥ आशाधरूनिफळाची॥ तीर्थी
व्रतींमुक्तिकैंची ॥ ३ ॥ तुकाह्मणेशिणसीवायां ॥ शर
णजातांपंढरिराया॥ ४॥ ॥ २७०५॥

संध्याकर्मध्यानजपतपअनुष्ठान ॥ अवघेंघेऊंनामउ
च्चारीतां ॥ १ ॥ नवेंचेमोलकांहींनलगतीसायास ॥ त
रीकांआळसकरिसीझणी ॥ २ ॥ ऐसेंहेंसारकांनघेसी
फुकाचें ॥ कायतुझेंवेंचेमोलतया ॥ ३ ॥ पुत्रस्नेहेंशो
ककरीअजामीळ॥ नवतोकृपाळजवळीउभा॥४॥ अ
नाथाच्यानाथेंघातलाविमानीं ॥ नेलाउचलुनीपरलो
का॥५॥ अंतकाळींगणिकापक्षियांच्याछंदें॥रामराम
शब्देंउच्चारिलें॥६॥ नवत्यादीनानाथाकृपाआलीत्या

स॥त्याणेंतेंतियेसवैकुंठानेलें॥७॥अवचितानामआ
लियाहेगति॥चिंतीतांतोंचित्तींजवळीअसे॥८॥तु
काह्मणेभावेंस्मरतांरामराम॥कोणजाणेत्याच्यात
येदशे॥९॥ ॥२७०६॥

दुष्टाचेंचिंतनभिन्नतेंअंतरीं॥जरीजन्मवरीउपदेसी
ला॥पालथेघागरीघातलेंजीवन॥नधरीचजाणतेंहि
त्याला॥१॥जन्मायेउनीतेणेपतनचिसाधीलें॥तमोगु
णेंव्यापीलातयानरा॥जळोजळोहेंत्याचेंज्यालेपण॥
कासयाहेआलेसंवसारा॥२॥पाषाणजीवनींअसतां
कल्पवरी॥पाहातांअंतरींकोरडातो॥कुचरमूगनयेचि
पांका॥पाहातांसारिखाहोतातैसा॥३॥तुकाह्मणेअ
सेउपायसकळां॥नचलेयाखळाप्रयत्नकांहीं॥ह्मणू
निसंगनकरितांभला॥धरितांअबोलासर्वहीन॥४॥
॥२७०७॥

काशियानेंपूजाकरूंकेशिराजा॥हाचिसंदेहमाझाफे
डींआतां॥१॥उदकेंन्हाणूंतरीस्वरूपतेंतूझें॥तेथेंकाय
माझेंवेंचेदेवा॥२॥गंधाचासुगंधपुष्पांचापरिमळ॥
तेथेमीदुर्बळकायकरूं॥३॥फळदातातूंचितांबूलअ
क्षता॥तरीकायआतांवाहोतुज॥४॥वाहूंदक्षिणात
रीधातुनारायण॥ब्रह्मतेंचिअन्नदूजेंनाहीं॥५॥गा
तोंतॐकारटाळीनादस्वर॥नाचावयाथारनाहींको
ठें॥६॥तुकाह्मणेमजअवघेंतुझेंनाम॥धूपदीपराम
कृष्णहरी॥७॥ ॥२७०८॥

गातांआईकतांकंटाळाजोकरी॥वासत्याअघोरींकुंभ
पाकीं ॥ १ ॥ रागेंयमधर्मजाचवीतीतया ॥ तुजदिल्हे
कासयामुखकान ॥ २ ॥ विषयाच्यासुखें अखंडजाग
सी॥नवजयेकादशीजागरणा ॥ ३॥ वेंचुनीयांद्रव्य
सेवीमद्यपान॥नाहींदिल्हेअन्नअतितासी ॥ ४ ॥ ती
र्थाटणनाहींकेलेउपकार॥पाळिलेंशरीरपुष्टलोभें॥५॥
तुकाह्मणेकेलेमगसाहेदंड ॥ नायकतिलंडसांगितलें
॥६॥ ॥२७०९॥
तुझेंह्मणवितांकायनाशझाला ॥ ऐकबाविठ्ठलाकीर्ति
तुझी ॥ १ ॥ परीतूजनाहींआमुचेउपकार॥नामरूपा
थारकेलियाचे॥ २॥समूळींसंसारकेलादेशधडी॥सां
डिलिआवडीममतेचि ॥ ३॥ लोभदंभकामक्रोधअहं
कार॥यासिनाहींथारऐसेंकेलें ॥ ४ ॥ मृत्तीकापाषाण
तैसेंकेलेंधन॥ आपलेंतेंकोणपरनेणे ॥ ५ ॥ तुकाह्मणे
झालोंदेहासिउदार ॥ आणीकविचारकायतेथें॥६॥
॥२७१०॥
जाउनीयांतीर्थाकायतुवांकेलें ॥ चर्मप्रक्षाळिलेंवरिव
री ॥ १ ॥ अंतरींचेंशुद्धकासियानेंझालें ॥ भूषणत्याके
लेंआपणया ॥ २ ॥ वृंदावनफळघोळिलेंसाकरा॥भी
तरीलथारामोडेचिना ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींशांतिक्ष
मादया॥तोंवरिकासयाफुंदातुह्मी ॥४॥ ॥ २७११ ॥
बैसोनिनिवांतशुद्धकरींचित्त ॥ तयासुखाअंतपारना
हीं॥ १॥ येउनिअंतरींराहीलगोपाळ ॥ सायासाचेंफ

ळबैसलीया ॥ २ ॥रामकृष्णहरीमुकुंदामुरारी ॥ मंत्र हाउच्चारोवेळोवेळां ॥ ३॥ तुकाह्मणेऐसेंदेईनमीदिव्य ॥जरीहोयभावयेकविध॥ ४॥ ॥ २७१२॥

धन्यपुंडलीकाबहुबरेंकेलें॥निधानआणिलेंपंढरीये॥१ नकरींआळसआलियासंवसारीं॥ पाहेंपांपंढरिभूवैकुंठ॥ २॥ नपविजेकेलेंतपाचियाराशी॥ तेंजनलोकांसी दाखविलें॥ ३॥ सर्वोत्तमतीर्थक्षेत्रआणिदेव॥ शास्त्रा नीहाभावनिवडिला॥ ४॥ विष्णुपदगयारामनामकाशी॥ अवघींपायांपासींविठोबाच्या ॥ ५॥ तुकाह्मणे मोक्षदेखिल्याकळस ॥ तात्काळयानाशअहंकाराचा ॥६॥ ॥ २७१३॥

धन्यतेपंढरीधन्यभीमातीर ॥ आणियेलेंसारपुंडलीकें ॥ १ ॥ धन्यतोहिलोकअवघांदैवाचा ॥ ॥सुकाळप्रेमाच्याघरोघरीं॥ २॥ धन्यतेहीभूमीधन्यतेतरुवर॥धन्यसरोवरतीर्थरूप ॥ ३ ॥ धन्यत्यानरनारीमुखींनामध्यान ॥ आनंदभुवनगर्जतसे ॥ ४ ॥ धन्यपशुपक्षीकीटकपाषाण ॥ अवघानारायणअंतरला ॥ ५॥ तुकाह्मणेधन्यसंसारातेंआलीं ॥ हरिरंगीरंगलींसर्वभावें ॥ ६ ॥ ॥२७१४॥

मायबापकरितीचिंता॥पोरनाईकेसांगतां॥ १॥ नको जाऊंदेउळासी॥ नेतोबागुललोकांसी ॥ २॥ कर्णद्वारें पुराणीक॥ भुलवीशब्दलावीभीक॥ ३॥ वैष्णवासंगतीं ॥हातींपडलीनेणोकिनी ॥ ४ ॥ आह्मांकैचामग॥

रिसीउघडीयासंग ॥ ५ ॥ तुकाह्मणेजाणेनरका ॥
त्याचाउपदेशआईका ॥ ६ ॥ ॥२७१५॥
मनमाझेंचपळनराहेनिश्चळ ॥ घडियेकीपळस्थीरना
हीं ॥ १ ॥ आतांतूंउदासनव्हेनारायणा ॥ धांवमजदी
नागांजियेलें ॥ २ ॥ धांवघालीपुढेंइंद्रियांचेवोढी ॥ के
लेंतढातोडीचित्तमाझें ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझानचलेसा
यास ॥ राहिलोंहेआसधरुनीतुझी ॥ ४ ॥ ॥ २७१६ ॥
मागतिलयांचेदोन्हीचतेकर ॥ अमितभांडारदातयाचें
॥ १ ॥ कायकरूंआतांकासयांतभरूं ॥ हामजविचारूप
डियेला ॥ २ ॥ येकेसांठवणेंप्रेमेवोसंडलीं ॥ जिव्हाहे
भागलीकरितांमाप ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतांआहेयेथें
असो ॥ आंखोनीयांबैसोंपायांपासीं ॥ ४ ॥ २७१७ ॥
जीचेंपीडेबाळ ॥ प्राणतियेचाविकळ ॥ १ ॥ ऐसामाते
चास्वभाव ॥ सूत्रदोरीयेकजीव ॥ २ ॥ सुखाचीविश्रां
ति ॥ उमटेमातेचियेचित्तीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेसंत ॥ तुह्मि
बहुरूपावंत ॥ ४ ॥ ॥ २७१८ ॥
यावेंमाहेरास ॥ हेचिसर्वकाळआस ॥ १ ॥ घ्यावीउच्छि
ष्टाचीधणी ॥ तीर्थेंइच्छिपायवणी ॥ २ ॥ भोगउभाआ
ड ॥ आहेतोंवरीचनाड ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवें ॥ माझेंसि
द्धीपाववावें ॥ ४ ॥ ॥ २७१९ ॥
लेंकराचेंहित ॥ वाहेमाउलीचेंचित्त ॥ १ ॥ ऐशीकळव
ळ्याचिजाति ॥ करीलाभावीणप्रीती ॥ २ ॥ पोटींभार
वाहे ॥ त्याचेंसर्वस्वहीसाहे ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझें ॥ तैसें

तुह्मासंतांवोझें ॥ ४ ॥ ॥ २७२० ॥

आह्मागांजीजन ॥ तरीकांमेलानारायण ॥ १ ॥ झालों पोरटींनिढळे ॥ नाहींठावबुडआळे ॥ २ ॥ आह्मीजना भ्यावें ॥ तरीकांनलाजीजेदेवें ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेश ॥ झालादेवावीणवोस ॥ ४ ॥ ॥ २७२१ ॥

तुह्मीपायसंतीं ॥ माझेंठेवीयेलेंचित्तीं ॥ १ ॥ आतांबा धूंनशकेकाळ ॥ झालीविषमशीतळ ॥ २ ॥ भयनाहीं मनीं ॥ देववसेघरींरानीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेभय ॥ आतांस्व प्नींचहीनये ॥ ४ ॥ ॥ २७२२ ॥

काळाचेहिकाळ ॥ आह्मीविठोबाचेलडिवाळ ॥ १ ॥ क रूंसत्तासर्वांठाईं ॥ बैसोंनिकटवसोंपाईं ॥ २ ॥ ऐसीको णाचीवैखरी ॥ वेदआमूचेसामोरी ॥ ३ ॥ तुकाह्मणेबा ण ॥ हातींहरिनामतीक्ष्ण ॥ ४ ॥ ॥ २७२३ ॥

जन्मायेउनिउद्धारझाला ॥ उद्धारकेलावंशाचा ॥ मेळउ निधनमेळवीमाती ॥ सदाविपत्तीभोगितसे ॥ १ ॥ ना मघेतांनमिळेअन्न ॥ नव्हेकोणदेखिलीया ॥ धर्मकरि तांऐकेकानीं ॥ बांधनिजोनीडोकियासि ॥ २ ॥ पराव्या हीपाहुणाआला ॥ ह्मणेत्यालाबरेंनाहीं ॥ तुमचेगावीं वैद्यआहे ॥ बैसोनिकायप्रयोजन ॥ ३ ॥ उजऊंकिती होतींपोरें ॥ मरतांबरेंह्मणेयासी ॥ ह्मणउनिदेवानवस करीं ॥ दावीघरींहूनिबोने ॥ ४ ॥ पर्वकाळींभटघराआ ला ॥ बोंबघालाह्मणेपोरां ॥ तुमचाउणाहोईलवांटा ॥ काळपिठासीपें आला ॥ ५ ॥ दाढीकरितांअडकागेला ॥